सकाळ
कोल्हापूर, बुधवार,
२६ ऑगस्ट २०१५
४

# शाहूंनी पारखलेला हिरा म्हणजे आबालाल

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठात कलादालनाचे उद्‌घाटन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : 'राजर्षी छत्रपती शाहू राजांसारख्या पारखी जोहऱ्यामुळेच कलातपस्वी आबालाल रहेमान यांच्यासारखा हिरा कोल्हापूरला मिळाला', असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे केले. रहेमान कलादालनाची उभारणी करण्यास शिवाजी विद्यापीठाने दिलेले सहकार्य ही या महान कलाकाराला वाहिलेली आदरांजली आहे, असेही त्यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठात रंगबहार संस्थेच्या सहकार्याने 'कलातपस्वी आबालाल रहेमान कला दालन' उभारण्यात आले आहे. त्याच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ चित्रकार श्यामकांत जाधव होते. बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन विस्तारित इमारतीमध्ये कार्यक्रम झाला.

डॉ. शिंदे म्हणाले, "काही वर्षांपूर्वी रहेमान यांच्या काही कलाकृती मुंबईच्या जे. जे. कला संग्रहालयात मी पाहिल्या. तोपर्यंत त्यांच्याविषयी मी पूर्णतः अनभिज्ञ होतो. पण, त्यांच्या कलाकृती पाहिल्यानंतर त्यांच्या महानत्त्वाची प्रचिती आली. आपल्या कलाकृतीतून केवळ रंगरेषांचा खेळ न मांडता त्यापुढे जाऊन त्यांचा शरीरशास्त्राचा अभ्यास, तत्कालीन सामाजिक, आर्थिक स्थिती मांडण्याचे कौशल्य यांचा प्रत्यय येतो. कोल्हापूरच्या कलाक्षेत्राला वेगळी उंची मिळवून देण्याचे कार्य रहेमान यांनी केले."



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रंगबहार संस्थेतर्फे कलातपस्वी आबालाल रहेमान कलादालनाचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी ज्येष्ठ चित्रकार श्यामकांत जाधव, प्राचार्य अजेय दळवी, बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, डॉ. नमिता खोत.

श्यामकांत जाधव म्हणाले, "रहेमान यांच्या कलागुणांची पारख राजर्षी शाहू यांनी केली. आपल्या दरबारामध्ये त्यांना स्थान दिले. यामुळे रहेमान यांनी सुमारे वीस हजारांहून अधिक उत्तमोत्तम कलाकृती निर्माण केल्या. एका पिढीचे काम जणू त्यांनी एकट्याने उभे केले. पण, राजर्षींच्या निधनानंतर त्यांनी दोन बोटी भरून कलाकृती पंचगंगेला अर्पण केल्या. उपलब्ध मोजक्या कलाकृतींतून त्यांच्या महान कार्याची प्रचिती येते."

या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी एन. व्ही. कोंगळे, विजयमाला मेस्त्री, धनंजय जाधव, अमृत पाटील, रियाझ शेख, सर्जेराव निगवेकर, राजाभाऊ उपळेकर, प्रवीण वाघमारे, शैलेश राऊत, राहुल रेपे, विलास बकरे, अभिजित कांबळे, किशोर पुरेकर, श्रीकांत डिग्रजकर, संजीव संकपाळ, अतुल डाके, व्ही. बी. पाटील, निर्मला कुलकर्णी, उज्ज्वल दिवाण, प्रेमला भोसले, रमेश बीडकर, मंगेश शिंदे, सुरेश पोतदार, वैशाली पाटील, सुनील पोवार उपस्थित होते. रंगबहारचे अध्यक्ष प्राचार्य अजय दळवी यांनी प्रास्ताविक केले. विजय टिपुगडे यांनी सूत्रसंचालन केले. ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी आभार मानले.

### सांस्कृतिक खंड करण्याची योजना

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, "कोल्हापूरच्या कला, सांस्कृतिक या बाजूंवर प्रकाशझोत टाकणारा एक स्वतंत्र खंड निर्माण करण्याची आमची योजना आहे. त्यामध्ये आबालाल रहेमान, बाबूराव पेंटर यांच्यासह अनेक कलातपस्वींच्या कार्याचा त्यात समावेश केला जाईल."

### दीडशे चित्रे प्रदान

या वेळी रंगबहारतर्फे विद्यापीठास समकालीन चित्रकारांच्या कुंचल्यातून साकारलेली सुमारे दीडशे दर्जेदार चित्रे प्रदान करण्यात आली आहेत. पहिल्या टप्प्यात सुमारे ५६ चित्रे कलादालनात प्रदर्शित करण्यात आली आहेत.